**भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र**

(सकाळ)

जा.क्र. ४४६/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १३/०६/२०१७

**१) घरात प्रवेश करुन अल्पवयीन मुलीचा विनयभंग केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ११/०६/२०१७ चे १६.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी अल्पवयीन पिडीत मुलगी ही आपल्या घरी एकटीच टि. व्ही पाहात असतांनी यातील आरोपीने कुणीही नसल्याची संधी साधुन पाहुण फिर्यादीचे घरात प्रवेश करुन फिर्यादी ही अल्पवयीन असल्याचे माहीत असुन सुध्दा आरोपीने पिडीत मुलीचा डावा हात धरुन भट्टीत ( झुडपी जंगलात ) चाल असे म्हणुन विनयभंग केल्याने फिर्यादी याचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ४५२,३५४(अ)(१)(२) भांदवि. सहकलम १२ बा. लै. अ. कायदा २०१२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. राऊत पो.स्टे. लाखनी हे करीत आहेत.

**२) संगनमत करुन महिलेस वाईट शिवीगाळ करुन मारण्या पिटण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक १२/०६/२०१७ ते १९.३० वा. दरम्यान यातील आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादी ही आपले अंगणात चुलीवर स्वयंपाक करीत असतांना आरोपी हे फिर्यादी जवळ जावुन सरपंच बरोबर काम करीत नाही म्हणुन वाईट–वाईट शिवीगाळ करुन मारण्या पिटण्याची धमकी दिल्याने फिर्यादी सौ. शामलता कृष्णा ठवरे वय ३९ वर्ष, रा. टेकेपार डोडमाझरी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोस्टे कारधा येथे कलम ४४८,५०४,५०६,३४ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. नवखरे पो. स्टे. कारधा हे करीत आहेत.

**३) संगनमत करुन कुंटनखाण्यात स्त्रियांचा अनैतीक व्यापार करतांना साहित्यासह मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १२/०६/२०१७ चे १६.३० वा. दरम्यान यातील आरोपीतांनी संगनमत करुन आरोपी क्र. १ चे घरी कुंटनखाना सुरु करुन त्या ठिकाणी पिडीत मुलीवर देहविक्री व्यवसाय चालवुन त्या कमायीवर आपली उपजिवीका करत असल्याचे मुखबीर खबरेवरुन धाड घातली असता यातील आरोपी हे मिळुन आल्याने त्याचे पासुन डिलक्स कंपनीचे ३२ सिलबंद कॉन्डंम काळया रंगाचा पाऊच मध्ये ५००/–रु. दराची चलनी नोट क्र. ३ व्ही डब्लु ८१२९६२ एकुण ५००/–रु. जप्त करण्यात आल्याने सरतर्फे फिर्यादी पोउपनी. लाजेवार महिला सेल भंडारा यांचे रिपोर्ट वरुन पोस्टे भंडारा येथे कलम ३,४,५(१),(क) स्त्रियांचा अनैतीक व्यापार प्रतिबंधक कायदा १९५६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. दांदळे पो. स्टे. भंडारा हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**४) संगनमत करुन क्षुल्लक कारणावरुन भांडण करुन डोक्यावर काचेचा ग्लॉस व बेलना मारुन ओरपडुन जखमी केल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक १२/०६/२०१७ चे १३.३० ते १७.०० वा. दर. यातील फिर्यादी अजय वसंत वाहारे वय ३८ वर्ष, रा. आंबेडकर वार्ड भंडारा यांची आरोपी हया बहीनी असुन फिर्यादीस तु आईचे सांभाड बरोबर करीत नाही तु व तुझी बायको या घरात राहु नको असे बोलुन फिर्यादी सोबत भांडण करुन फिर्यादीचे डोक्यावर काचेचा ग्लॉस फेकुन, ओठावर बेलना मारुन नखाने ओरपडुन जखमी केल्याने फिर्यादी यांचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पो.स्टे भंडारा येथे कलम ३२४,५०४,३४ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सपोनी. तोडासे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

५) शासकीय आधारभुत केन्द्र वळद चे पटांगणात ठेवलेले धानाच्या कट्याची चोरी :–

दिनांक ११/०६/२०१७ चे २३.४५ वा. दर. यातील आरोपीने फिर्यादी गोविंद गोपाल विठ्ठले वय ३६ वर्ष, रा. वळद शासकीय आधारभुत केन्द्र वळद चे पटांगणात विक्री करीता ठेवलेले २१३ नग धानाच्या कट्या पैकी ८ ते १० कट्टे किंमती अंदाजे ६०००/–रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पो.स्टे साकोली येथे कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. परशुरामकर पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

६) क्षुल्लक कारणावरुन भांडण व शिवीगाळ करुन बासाच्या काठीने डोक्यावर मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद . :–

दिनांक १२/०६/२०१७ चे ०९.३० वा. दर. यातील फिर्यादी घनश्याम आत्माराम टेंभुरकर वय ४० वर्ष, रा. सितासांवगी व आरोपी हे संख्ये भाऊ असुन आरोपीने त्याचे सांदवाडीतील झाडाच्या फांदया तोडल्याने फांद्या फिर्यादीचे घरी ठेवलेल्या प्लास्टीकच्या टपावर वर ड्रमवर पडुन फुटुण नुकसान झाली म्हणुन फिर्यादीला राग येवुन आरोपीचे कवेलुचे घरावर चढला असता आरोपीने तु माझ्या घरावर का चढला असे म्हणुन भांडण करुन शिवीगाळ केली व बासाच्या काठीने डोक्यावर, उजवे हाताचे मनगटावर मारुन व उजवे हाताच्या एका बोटाला चावा घेतल्याने फिर्यादी यांचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पो.स्टे गोबरवाही येथे कलम ३२४,५०४ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. मेश्राम पोलीस स्टेशन गोबरवाही हे करीत आहेत.

७) औषधोपचारा करीता उपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु. :–

दिनांक १२/०६/२०१७ चे २२.४५ वा. पुर्वी. यातील मृतक रक्षपाल माधवजी राऊत वय ४८ वर्ष, रा. बोरी याची बिपी कमी झाल्याने त्यास औषधोपचारा करीता सु. बो. दवाखाना येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने डॉ. मेमो वरुन पो.स्टे तुमसर येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. धार्मीक पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत

८) अवैध देशी/जुगार दारु अडयावर धाडी . :–

दिनांक १२/०६/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोस्टे भंडारा, जवाहरनगर, कारधा, वरठी, सिहोरा, साकोली, पालांदुर व अडयाळ येथे अवैध देशी दारु अडयावर धाडी घालुन एकुण ११ गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन ७५ लिटर हातभट्टी दारु किंमती ५,७००/–रु. १८ लिटर ६३० मिली लिटर देशी दारू किंमती ६,१००/–रु. व जुगारातुन किंमती १७७५/–रु. असा एकुण किंमती १३,५७५/–रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

९) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–

दिनांक १२/०६/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १३४ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी ०७ तीन सिटर वाहनांवरती २० केसेस व तसेच ईतर वाहनांवरती १०७ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी. ८८०५६५७२६२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.